# प्रेसनोट

जा.क्र. पोउप-आ/वाहतूक/ ५८४६/२०१७ पुणे शहर, दिनांक -३१/०७/२०१७

**विषय :- लोकशाहीर आण्णाभाऊ साठे जयंती निमित्त करण्यात आले वाहतूक व्यवस्थेतील बदलाबाबत.**

लोकशाहीर आण्णाभाऊ साठे जयंती निमीत्त दिनांक ०१.०८.२०१७ रोजी पुणे शहरातील विविध ठिकाणची स्थानिक मंडळे व राजकीय पक्ष कार्यकर्ते **लोकशाहीर आण्णाभाऊ साठे पुतळा, सारसबाग, पुणे** या ठिकाणी मिरवणूकीने येऊन पुष्पहार अर्पण करणार आहेत. त्याचप्रमाणे जेधे चौक ते सारसबाग दरम्यानचे बालाजी विश्वनाथ पथावर एकत्र जमणार आहेत. त्यावेळी वाहनचालकांची गैरसोय होऊ नये, तसेच वाहतूक सुरळीत चालावी याकरीता आवश्यकते नुसार स्वारगेट परिसरातील वाहतूक व्यवस्थेमध्ये खालील प्रमाणे बदल करण्यात येणार आहेत.

१. जेधे चौकातुन सारसबाग चौकाकडे जाणेस प्रवेश बंद करणेत येत आहे.

२. जेधे चौक ते पुरम चौक या रस्त्यावरील एकेरी मार्गात शिथीलता देवुन प्रवेश देण्याची परवानगी देण्यात येत आहे.

३. पुरम चौक ते जेधे चौक दरम्यान ( टिळक रस्त्यावर) रस्त्याचे दोन्ही बाजुस नो-पार्कीग करण्यात येत आहे.

४. जेधे चौकाकडून सिंहगड रोडला जाण्यासाठी हाल्गा चौक-सावरकर चौक मार्गे सिंहगडरोडला जावे.

सदर भागातील वाहतूक परिस्थिती नुसार आवश्यक ते बदल करण्यात येणार आहेत. तरी वाहनचालकांनी उपलब्ध पर्यायी मार्गाचा वापर करुन, वाहतूक पोलीसांना सहकार्य करावे.